# उत्तर पत्रिका

"कसा आहेस" असा तू टेक्स्ट टाकलास
कदाचित तुझा वेळ जात नसेल
किंवा तू नवीन फोन टेस्ट करीत असशील
किंवा खरोखरंच तुला तसे विचारायचे असेल!

तुझ्या प्रश्नाने मी विचारात पडलो
खरंच! मी कसा आहे?
चांगला, सद्गुणी, सर्वांना हवाहवासा? (तुला तरी?)
की नालायक, कोडगा, दुर्गंधी, नकोसा!

मधमाशांच्या पोळ्यावरून झुळुक जावी
आणि माशा दचकून इतस्ततः उडाव्यात
तसे माझे विचार सैरावैरा झालेत
प्रिये तू टाकलेस विचित्र पेचात

जिथे ऐकू येत नाही तुझा आवाज
कानोसा देऊनही; सापडत नाही जिथे
दीर्घ श्वासालाही तुझा धुंद गंध
तुझा मऊ स्पर्श चाचपडण्यात आयुष्य जाते

जिथे तुझे शब्द यांत्रिक होऊन
दुखवतात बाणासारखे टोचून
तिथे मी अजून कसा असणार
सांग ना तूच प्रिये मला इथे येऊन!

By: Abhay B. Joshi